
करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक
कमलाभवानी
# संदेश
वर्ष 34 वे
| www.saptahiksandesh.com |

संस्थापक संपादक
डॉ.अॅड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण
साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
संपर्क 9822058106
www.saptahiksandesh.com
9822058106

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.२३ | पाने–२० | दि.१४/०६/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.

मजबुती आणि विश्वास एकाच ठिकाणी...!
प्रोप्रा.अमोल ढवळे मो.९८५०१२५५६१
**शिवम बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
आयकॉन स्टील व सिमेंटचे अधिकृत विक्रेते
PARAS Group of Industries
आमच्याकडे नामांकित कंपनीचे स्टील, सिमेंट, सनला, पत्रे, चैनल, पाईप,
क्रशसॅन्ड व खडी तसेच बांधकामासाठी लागणारे मटेरीयल होलसेल दरात मिळेल.
पत्ता : बायपास रोड, निलज चौक,
संत निरंकारी मंडळ शेजारी, करमाळा



# पीएमश्री योजनेत चार शाळांची निवड - पाच वर्षात १ कोटी ८८ लाख रू. अनुदान मिळणार

करमाळा : केंद्र शासनाची पीएमश्री योजना राज्यात लागू करण्याबाबत राज्यशासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार प्रत्येक तालुक्यातील जिल्हा परिषदेची एक व शहरी भागातील एक अशा दोन शाळा निवडण्याचे धोरण आहे. त्यानुसार सुरूवातीला जिल्हापरिषद शाळा वांगी नं.१ व करमाळा शहरातील सेंट्रल स्कुल नं.१ या दोन शाळांची निवड करण्यात आली आहे. तर गेल्यावर्षी जिल्हा परिषद शाळा घोटी व करमाळा शहरातील साधनाबाई नामदेवराव जगताप शाळा अशा चार शाळांची निवड करण्यात आली आहे.

निवड झालेल्या शाळांना पाच वर्षात १ कोटी ८८ लाख रूपये अनुदान दिले जाणार आहे. राज्यशासनाने राज्यातील ८१६ शाळांना पीएमश्री योजनेत समाविष्ट करण्यासाठी मान्यता दिली असून त्यासाठी दरवर्षी १२२ कोटी रूपये मंजूर केले आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नूसार एक समान, सर्व समावेशक आणि बहुवचन समाजाच्या निर्मितीसाठी विद्यार्थी हा परिपूर्ण नागरीक बनला पाहिजे; अशी या मागची भुमिका आहे.



केंद्र शासनाच्या या योजनेत निवडलेल्या शाळांमध्ये तंत्रज्ञानावर भर दिला जाणार आहे. या शाळेत स्मार्ट क्लास व खेळावर विशेष लक्ष दिले जाणार आहे. या योजनेतून विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविणे, साक्षरता प्रमाण वाढविणे, गळती कमी करणे यावर उपाययोजना राबविलेल्या आहेत . तसेच या शाळांमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी केली जाणार आहे. या शाळामध्ये ग्रंथालय, कौशल्य प्रयोग शाळा उभारल्या जाणार आहेत तसेच तंत्रज्ञानावरही भर दिला जाणार आहे. त्यानुसार शहरी भागातील एक व ग्रामीण भागातील एक शाळा यांची प्रतीवर्षी निवड केली जाणार आहे. निवडीसाठी दर तीन महिन्याला निवड समितीची बैठक असते. तालुक्यातील वांगी, घोटी व शहरातील नगरपालिकेच्या दोन शाळा निवडल्या असून याबाबत विशेष कामगिरी सुरू झाली आहे.

**...मनोज राऊत (गटविकास अधिकारी करमाळा)**

Reg No : F-31904
**ईशा पॅरामेडिकल अॅन्ड एज्युकेशनल इन्स्टिट्यूट, करमाळा.**
Affiliated By :- Engineering & Management Institute of India Under the Department of Higher Education
Ministry Of Education Gov. of India (MHRD code : S-21363)

**इंजिनिअरींग व टेक्नीकल**
क्षेत्रात करिअर घडविण्याची सुवर्णसंधी !
Eligibility for Technical Courses
Duration : 3 years (6 Semester),
Qualification : 10th or Eq.
Duration : Lateral Entry 2 yrs. (4 Semester)
Qualification : 12th PCM / ITI
ADMISSION OPEN
- Diploma in Civil Engineering
- Diploma in Computer Eng.
- Diploma in Electrical Eng.
- Diploma in Computer Science
- IT & Management



**आरोग्य क्षेत्रात**
करिअर घडविण्याची सुवर्णसंधी !
ADMISSION OPEN
Affiliated By :- Lal Bahadur Shastri Paramedical Council Under the Department of Higher Education Ministry Of Education Gov. of India (MHRD code : S-21267)
Eligibility For Paramedical Courses
Qualification : 12th Science
- Optometry
- D.M.L.T.
- Diploma in Sanitary Inspector
- Diploma in X-ray Technician
- Diploma in Dialysis Technician
- All Paramedical Course Available



कॉलेजची खास वैशिष्ट्ये : ● सुसज्ज इमारत ● तज्ञ शिक्षक वृंद ● प्रॅक्टीकलसाठी लॅब ● १००% जॉब प्लेसमेंट
■ शिष्यवृत्ती योजना उपलब्ध
■ लिमिटेड सीट तरी आजच आपला प्रवेश निश्चित करा !
पत्ता : सोलंकर बिल्डींग, नगर रोड, बायपास, मॉर्डन जिम, २ रा मजला, करमाळा (९९७०९३०१५३, ९७३००३३१२४)

प्रगती करण्यासाठी योग्य निर्णय,तत्पर अमंलबजावणी व सतत कष्टाची गरज असते.

## संपादकीय.........................................!

# गोष्ट छोटी–हानी मोठी...!

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात प्रगती महत्वाची असते. ही प्रगती मोजण्यासाठी अनेक पर्याय आहेत. सत्ता, संपत्ती, पैसा, शैक्षणिक डिग्री, व्यवसाय आदीचा समावेश होतो. खरंतर ही वेगवेगळी साधने आहेत. यामध्ये आपण फक्त पैसा हाच घटक महत्वाचा ठरवतो. वास्तविक पाहाता मनुष्य जीवनाचे उद्दीष्ट सुख हे आहे. सुख मिळण्यासाठी अनेक साधने लागतात. अर्थातच साधने मिळविण्यासाठी पैसा हे एक माध्यम आवश्यक आहे. ज्याच्याकडे जास्त पैसा त्याची प्रगती झाली असे म्हटले जाते. पैसा मिळविणे सोपे असते, पण टिकविणे कठीण असते ही वास्तवता आहे. अर्थातच हे अर्धसत्य आहे. अनेकांना पैसा कसा मिळवावा याचीही भ्रांत असते, त्यामुळे टिकविण्याचा प्रश्न येतच नाही. दुसऱ्या बाजूला प्रचंड पैसा मिळतो, पण त्या पैशाचे योग्य नियोजन होत नाही. अर्थातच त्यामुळे प्रगतीत अडथळे येतात. या पार्श्वभूमीवर किती पैसे मिळविले यापेक्षा किती पैसे शिल्लक ठेवले ही बाब जीवनात महत्वाची आहे. अनेकजण पैसे कमवितात, काही काळ मस्त जगताततही, नंतर पुढे मात्र हे लोक अडचणीत येतात. ज्या वयात सुखासमाधानाने जगायचे अशा वयात केवळ जगण्यासाठी या मंडळींना धावपळ करावी लागते. त्यामुळे दैनदिन जीवनात काही तत्व आखून जगलोतर भविष्य उज्वल राहू शकते. यासाठी योग्य नियोजन व काटकसर महत्वाची असते.

आपण घरात जेंव्हा जेवण करतो, तेंव्हा आपण किती खाऊ शकतो, हे ज्याचे त्याला समजते; पण प्रत्येकजण आपण खाणार त्यापेक्षा जास्त घेतो आणि शेवटी ताटात उष्ट ठेवतो. खरंतर आरोग्यशास्त्र सांगते, की प्रत्येक माणसाने भुकेपेक्षा किमान चतकोर भाकरी कमी खावी, पण तो नियम सोडून आपण ज्या अन्नाला 'अन्न हे पुर्ण ब्रम्ह' म्हणतो तेच अन्न वाया घालून रस्त्यावर फेकतो. दुसऱ्या बाजुला लाखो लोक अन्नाअभावी अर्धपोटी रहातात, याचा विचार आपण करत नाही. आणखी एक गोष्ट म्हणजे अलीकडे गरज नसताना हॉटेलात जेवावयास जाणे ही प्रथाच पडली आहे. हॉटेलची निर्मिती कशी झाली हे माहित आहे, का..? पुर्वी साधनं नव्हती किंवा कमी होती. त्यावेळी दुर गावी प्रवास करणाऱ्या प्रवाशांची सोय नसे. त्यांना उपाशी रहावे लागत असे किंवा मागून खावे लागत असे. अशा प्रवाशावर उपाशी रहाण्याची पाळी येवू नये व व्यावसायीकालाही उत्पन्न मिळावे यातून हॉटेल व लॉज व्यवसाय उभे राहिले. अलीकडे तो उद्देश संपून अनेक लोक उठ-सुट हॉटेलात जेवायला जातात. घरचा स्वयंपाक वाया गेलातरी चालेल पण हॉटेलात जेवावयास जायचे हे ठरलेले असते. खरंतर घरचे अन्न हे घरचेच असते. त्यामध्ये जीवनसत्व तर असतातच पण वेगळीच चव आणि वेगळी भावना असते. असे असूनही केवळ चमचमीत जेवणासाठी हॉटेलात जावून शेकडो रूपये वाया घालवून आरोग्य खराब करतो. यापेक्षा बेकार गोष्ट म्हणजे लग्न किंवा अन्य समारंभातील पंगतीचे जेवण असो की बुफे जेवण असो, त्यात प्रचंड अन्न वाया घालवले जाते. यातून जे नुकसान होते ते पैशात तर होतेच पण राष्ट्रीय हानी होते ती वेगळीच. याप्रमाणेच पिण्याचे पाण्याचे झाले आहे.

शुध्द पाणी पिण्याच्या नावाखाली मिनरल वॉटर घेतले जाते. जॅर घेतले जातात. खरंतर बंद बाटलीतील पाणी शुध्द असतेच असे नाही. अनेक पाण्याच्या बाटलीत नको ते पदार्थ सापडले आहेत. घरचे पाणी शुध्द, गाळलेले व नेहमीच्या चवीचे असताना अनेकजण सर्रास बंद पाण्याची बाटली घेऊन तहान भागवतात आणि कारण नसताना सहा रूपयाच्या पाण्याच्या बाटलीसाठी २०-२० रूपये खर्च करतात. लहान मुलांना लाडाने पैसे देणारे अनेक पालक आहेत. ही मुलं या पैशातून चटपटीत खातात, घरी जेवत नाहीत. त्यामुळे घरचे अन्न वाया जाते, याशिवाय चटपटीत खाण्याने मुलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. येथे तिहेरी नुकसान होते. चटपटीत येण्याला पैसे जातात, अन्न वाया जाते आणि आरोग्यचे नुकसान होते. त्यानंतर दवाखान्यात जाण्याची वेळ येते तिथे खर्च करावा लागतो, तो वेगळाच.

दात घासायला घेतलेली पेस्ट, डोक्याला लावण्यासाठी घेतलेले तेल, तोंडाला लावण्यासाठी घेतलेली क्रिम किंवा पावडर, कपडे धुण्याचा तसेच अंगाला लावण्याचा साबण, भांडी घासण्यासाठी वापरलेला बार याबाबी साध्या असल्यातरी त्यातून बचत झाली नाहीतर वर्षभरामध्ये शेकडो रूपयेचे नुकसान होते. टुथ पेस्टच्या बाटलीचे तोंड कंपनी मोठे ठेवते कारण तोंड मोठे ठेवल्यामुळे जादा पेस्ट येते ती तशी वापरली जाते व पेस्टचा खप वाढतो. तीच स्थिती प्रत्येक तेलाच्या बाटलीपासून ते क्रिमच्या ट्युब पर्यंत आहे. याचा विचार सर्वानीच केला पाहिजे.

घरातील नळाचे पाणी कसे आणि किती वापरायचे, याचा विचार झाला नाहीतर शेकडो लिटर पाणी स्वच्छतागृह आणि गटारीत वाया जाते. कपडे धुण्यासाठी , गाडी धुण्यासाठी, अंगणात मारण्यासाठी, दारातील झाडाला अजीर्ण होईपर्यंत पाणी देणे, या सर्व बाबीचा विचार केला नाहीतर करोडो रूपयाचे नुकसान होते. सतत दुष्काळ पडत असल्यामुळे अलिकडे शेतकऱ्यांना पाण्याचे महत्व पटले आहे, त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन वापर सुरू केला आहे, ही बाब महत्वाची आहे.

मोटारसायकल, चारचाकी वाहने याची गरज असेल तेंव्हाच वापर केला पाहिजे, कारण नसताना अनेक वाहने तासंनतास फिरवली जातात तर काही चालू असतात. त्यामुळे प्रदुषण वाढते, त्याशिवाय डिझेल-पेट्रोल वाया जाते. विशेषत: ट्रक, टेम्पो, ट्रॅक्टर ज्याला जास्त डिझेल लागते तीच वाहने धक्का स्टार्ट असतात व त्यातून डिझेल जळून लाखो रूपयाचे नुकसान होते.मुळातच डिझेल-पेट्रोल हे बाहेरून मागवत असल्यामुळे प्रत्येक नागरीकाने त्यासाठी सतर्क असण्याची गरज आहे.

वीजेबाबतही सतर्कता महत्वाची आहे. जिथे गरज असेल तिथेच बल्ब, ट्युब लावली पाहिजेत. अनेक हॉटेल, धाबे यावर जादा शक्तीचे प्रकाशाचे दिवे लावून वीज वाया घालवली जाते. गावातील समारंभ, उत्सव अशाप्रसंगी प्रमाणापेक्षा जास्त दिवे लावणे हे अनर्थकारी आहे. हे उत्सव केले पाहिजेत पण त्याला प्रमाण आवश्यक आहे. गावाला जायचे तर काही लोक दिवसभर वीज बंदच करत नाहीत. सार्वजनीक कार्यालय, रस्त्यावरील दिवे, मंदिरे व अन्य ठिकाणीतर वीजेचे दिवे, पंखे कारण नसताना सुरू असतात. त्यामुळे वीजेचे बील जास्त येतेच पण आपल्याकडे वीजेचा दुष्काळ आहे, हे लक्षात घेऊन तीची चैन कमी करण्याची आवश्यकता आहे.

घर बांधताना, घरात फर्नीचर खरेदी करणे तसेच कपडे, चप्पल ,चष्मे, मोबाईल, वाहने खरेदी करताना खुप विचारपुर्वक खरेदी केली पाहिजे अन्यथा या बाबीला कोणतेही लिमीट असत नाही. प्रत्येक बाबतीत एकापेक्षा एक वस्तु असतात पण आपली कुवत किती व आपली गरज किती याचा विचार करून घर बांधले पाहिजे. परवा एका पाहुण्याकडे गेले होतो. गप्पा मारताना घराचे काम का अपुरे राहिले असे विचारल्यावर ते म्हणाले, 'घर बांधताना अंदाज आला नाही. पाहुण्यांनी आम्हाला मोठा प्लॅन दिला, त्याप्रमाणे बांधकाम धरले पण बजेट निम्मे कामातच संपले. त्यामुळे आता वर्ष-दोन वर्ष बजेट तयार होईपर्यंत बांधकाम थांबवले आहे. अर्थातच त्या परिवारात मोजून पाच माणसं, त्यांनी सात खोल्याचा बंगला बांधायला घेतला होता. काहीजण तर जन्माला येवून सुंदर, भव्य घर बांधतात आणि त्याचे कर्ज आयुष्यभर फेडतात पण फिटत नाही, उर्वरीत कर्ज त्यांची पुढची पिढी फेडते. अशा घराची खरंच गरज आहे का..? याचा विचार होणे गरजेचे आहे.

साडीच्या दुकानात एक महिला गेली. प्रथम सेल्समनने सहाशे रूपयाची साडी दाखवली, खरंतर ती चांगली होती. बाईला आवडली पण त्याने किंमत सहाशे सांगितल्यावर पसंत साडी किंमतीमुळे तीने दुसरी दाखवा म्हणून सांगितली. सहाशे ते पाच हजार रूपया पर्यत साडी दाखवली; पण बाईला पसंत पडली नाही. त्यानंतर त्या सेल्समनने सहाशे रूपयाची साडी दुसऱ्या रंगाची दाखवली व तीची किंमत सहा हजार सांगितली. बाईला ती खुप आवडली व पसंत केली. बील देताना सहाशे रूपये पाहिल्यावर बाई वरमली व खुशही झाली. कपडे किंमतीवर चांगली नसतात तर आपली गरज आणि सुत पाहून ठरवावी लागतात. तीच गत चप्पल, वाहनाच्या बाबतीत आहे. फॅशनच्या नावाखाली कोणतीही वस्तु घेतलीतर किंमत जास्त जाते व तीला आयुष्यही कमी लाभते.

उत्पन्नावर प्रगती नसतेतर आलेल्या उत्पन्नाचे नियोजन कसे करतो यावर बरेच अवलंबून असते. एकाला दरमहा ८० हजार रूपये पगार होता. घरी वाहन, वाहन चालक, पी.ए., बागकामासाठी माळी, घरच्या कामाला गडी, बाईसाहेबाच्या हाताखाली धुणे-भांडीसाठी बाई, स्वयंपाकासाठी बाई, स्वच्छतेसाठी बाई अशा प्रकारे कमगारांचा पगार दरमहा ३५ हजार जायचा. शिवाय दुध, किराणा, कपडे आणि अद्यायावतपणाच्या नावाखाली सतत फर्नीचर, मोबाईल बदलणे अशासाठी उर्वरीत पगार जायचा. थोडक्यात काय तर जेवढा पगार मिळायचा तेवढा खर्चाला गेलातर हाती काय उरले, मग भविष्याचे काय..? अशी माणसं सेवानिवृत्तीनंतर लोकाच्या हाताखाली कामाला जातात हे विसरून चालत नाही. याउलट ३० हजार पगारातील माणूस घर टुमटुमीत चालवून सर्वांना समाधानात ठेवून दरमहा निम्मा पगार शिल्लक ठेवून आपले भविष्य चांगले ठेवतो. त्यामुळे गोष्ट छोटी असलीतरी हानी मोठी होते, हे महत्वाचे आहे. वेळ अजुनही गेलेली नाही. प्रत्येकाने आज पासून विचार करून प्रत्येक बाब समजून उमजून केलीतर नक्कीच चांगली प्रगती होऊ शकेल. आपल्या प्रगतीसाठी हा एक सहज अनुकरणाजोगा मार्ग आहे. तो अनुसरावा हीच अपेक्षा..!

## मकाई कारखान्याच्या तज्ञ व स्विकृत संचालकांचा सत्कार



करमाळा(सं.प्र.) : श्री मकाई सहकारी साखर कारखान्याच्या तज्ञ व स्वीकृत संचालक पदी अ‍ॅड.जयदीप देवकर, गणेश तळेकर (वांगी), विलास काटे (खातगाव), महेश तळेकर(केम), अशोक पाटील (फिसरे), अनिल शिंदे (कोळगाव), राजेंद्र मोहोळकर (मोरवड) व कल्याण सरडे (सांगवी) यांची निवड करण्यात आली आहे. या सर्व नूतन सदस्यांचा सत्कार बागल गटाच्या नेत्या रश्मी बागल–कोलते, युवा नेते दिग्विजय बागल यांनी केला. यावेळी बागल गटाचे कार्यकर्ते व मकाई कर्मचारी उपस्थित होते.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)



'गणित' विषयाचे
पवार क्लासेस
"भरपूर गुणवत्ता..., यशाची उज्वल परंपरा !"
Math
यशस्वी परंपरा
दहावीच्या परीक्षेत गणित विषयात उज्वल यश संपादन करणाऱ्या 'पवार क्लासेस' मधील गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !
म.गांधी विद्यालयात प्रथम
प्रणव वीर (९३.८०%, गणित-९५)
म.गांधी विद्यालयात द्वितीय
महेक मलिक (९२.४०%, गणित-९२)
म.गांधी विद्यालयात तृतीय
ओपल लुणावत (९१.६०%, गणित-८९)
म.गांधी विद्यालयात चौथा
आदित्य गवळी (९१.२०%, गणित-९४)
म.गांधी विद्यालयात पाचवी
ऋतुजा झिंजाडे (९१.००%, गणित-८९)
अभिजीत कणसे (गणित - ९४)
अवधुत चव्हाण (गणित - ९२)
वेदिका मारकड (गणित - ९१)
आदित्य नायकुडे (गणित - ९१)
प्रथम सीतापुरे (गणित - ९१)
पियुष देमुंडे (गणित - ९०)
सृष्टी भोसले (गणित - ९०)
प्रतिक भुजबळ (गणित - ८९)
गोविंद पवार (गणित - ८९
सानिका शहा (गणित - ८९)
यश्वी वासानी (गणित - ८९)
आर्यन गायकवाड (गणित - ८६)
समीक्षा कटारिया (गणित - ८५)
स्नेहल शिंदे (गणित - ८४)
पृथ्वीराज पाटील (गणित - ८४)
आदिती घोलप (गणित - ८३)
प्रज्ञा शिंदे (गणित - ८३)
आदर्श कोंगे (गणित - ८३)
अक्षरा घोलप (गणित - ८२)
युवराज वीर (गणित - ८२)
जान्हवी अगवणे (गणित - ८१)
मानसी सीतापुरे (गणित - ८१)
आदिती नाळे (गणित - ८१)
प्रेमजीत मेहेर (गणित - ८०
स्वामिनी जगदाळे (गणित - ८०)
सौ.पवार एम.व्ही.
M.Sc.(Math) B.Ed
नवाज खान (गणित - ८०)
रूद्रा पुराणिक (गणित - ८०)
इ.५ वी सेमी पूर्व तयारी क्लासेस सुरू
● पत्ता : घोलपनगर, करमाळा. मो.9405948353, 9356440859

# नवभारत इंग्लीश स्कुलचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा



करमाळा(सं.प्र.) : श्री गिरधरदासजी देवी प्रतिष्ठान संचलित नवभारत इंग्लीश मेडिमय स्कुल व ट्विंकलींग स्टार्स तसेच वेताळपेठ येथील नवभारत शाखा मध्ये १३ जून रोजी शाळेचा पहिला दिवस मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. शाळेचा पहिला दिवस असतानाही मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी आपली हजेरी लावली होती. शाळेची सुंदर अशी सजावटही करण्यात आली होती.

यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, शितलताई करे-पाटील, डॉ.गुंजकर व पालक वर्ग यांचे हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष कन्हैयालाल देवी, अमोद संचेती, विजयकुमार दोशी, चंद्रकांत देवी उपस्थित होते. आजच्या दिवसाचे प्रमुख आकर्षण म्हणजे मुलांचे आवडते कार्टून्स छोटा भीम, मोटू, पतलू लाला, लाली यांच्या वेशातील कार्टून्स मुलांच्या समोर उपस्थित होते व मुलांना कॅटबरी देत होते. त्यामुळे हे पाहून मुले खूपच उत्साही व आनंदीत झाली होती. खूप दिवसानंतर पुन्हा एकदा शाळेच्या परिसरात किलबिलाट गोंगाट चालू झाला होता. सर्वप्रथम शाळेमध्ये प्रार्थना घेण्यात आली. त्यानंतर नवागत विद्यार्थ्यांनी आपली सर्वांना ओळख करून दिली. त्यानंतर शाळेच्या सर्वेसर्वा सुनिता देवी व मुख्याध्यापिका सुनिता मोहिते यांचे हस्ते मुलांचे औक्षण करण्यात आले. यावेळी मुलांच्या ॲक्टिव्हीट गेम्सही घेण्यात आल्या. याप्रसंगी सर्व शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.




विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर
● प्लायवुड ● किचनट्रॉली ● वॉलपेपर
● हार्डवेअर ● फेव्हिकॉल ● वुडन फ्लोरिंग ● सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर


# अजित रणदिवे यांचा १८ जूनला एकसष्टीपूर्ती समारंभ



करमाळा(सं.प्र.) : रामवाडी येथील सामाजिक व राजकीय क्षेत्रात अग्रेसर असणारे पश्चिम भागातील नेते अजित रणदिवे यांचा १८ जूनला ६१ वर्षे पूर्ण होत असल्याबद्दल एकसष्टीपूर्ती सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम विठ्ठल व्हेज हॉटेल, खडकी (पुणे-सोलापूर हायवे) येथे होणार आहे. यावेळी विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांचे हस्ते त्यांचा सत्कार होणार आहे. या समारंभास उपस्थित राहण्याचे आवाहन सत्कार समिती तर्फे करण्यात आले आहे.

अजित रणदिवे यांचे तालुक्यातील सर्वच राजकीय गटाबरोबर व त्यांचे नेत्यांबरोबर सलोख्याचे संबंध राहिले आहेत. राजकारणापेक्षा समाजकारणात त्यांचा मोठा वाटा आहे. गावातील हरिनाम सप्ताहमध्ये त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांची एकत्रित कुटूंब पध्दतीनुसार एकत्रित फॅमिली आहे. आजच्या काळात एकत्रित कुटूंब पध्दतीचे हे एक दुर्मिळ उदाहरण आहे. श्री.रणदिवे हे १९९७ ते २००२ या काळात रामवाडी ग्रामपंचायतीचे सदस्य होते. तर २००२ ते २००७ या काळात ते ग्रामपंचायतीचे बिनविरोध सरपंच होते. २००६ ते २०११ या काळात त्यांच्या आई श्री मकाई सहकारी साखर कारखान्याच्या संचालिका होत्या. २००० ते २०२० या काळात रामवाडी सोसायटीचे चेअरमन होते व सध्या ते या सोसायटीचे विद्यमान व्हा.चेअरमन आहेत. अण्णा या नावाने ते परिचीत असून त्यांच्या १८ जूनला असलेल्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !
खालील सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या MRP वर कमीत कमी
10% पासून 51% पर्यंत
डिस्काउंट
अंबारी, सुहाना, प्रविण, रामबंधू, नवजीवन हिंग, किसान, काटदरे, चिंग्ज, कुकवेल, सवई मसाले,
पारले, ब्रिटानिया, सनफिस्ट, हलदीराम चितळे, अमुल, लक्ष्मीनारायण, दावत कल्याण भेळ, सफोला,
कोलगेट, पतंजली, पेप्सोडेंट, मेस्वाक, बबुल, विको, मॅक्सफ्रेश, मेडिमिक्स, संतुर, डव्ह, मोती, लिरील
टाटा, सोसायटी, विक्रम, रेड लेबल, सह्याद्री, परिवार, नेस व ब्रु कॉफी, लिपटन ग्रीन टी व ड्रायफ्रुटस्
पॉण्डस पावडर, पॅराशुट, एचयुल, गुडनाईट, हिमालया, डाबर, गोदरेज, सर्व टूथपेस्ट व टूथब्रश
डेटॉल, हारपीक, लॉयजॉल, निरमा, रिन, टाईड, एरियल, व्हील, पितांबरी, विम, लक्स, लाईफबॉय
इंदुलेखा, सेसा, केशकिंग, नवरत्न, लॉरिअल पॅरिस, जस्मीन, व्हॅसलीन, निविया, फॉग, यार्डली, केएस
गाला, मिल्टन, ओरल बी, हगीज व सर्व बेबी प्रोडक्टस्, बेकरी, स्वीटस् व नमकीन, पुजा साहित्य इ.
टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !
॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
एव्हरफ्रेश सुपरमार्ट
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥
*नियम व अटी लागू
किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन ॲन्ड स्वीटस् । बेकरी ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस् । । नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम ॲन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य
पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031


मुंबई
पोलिस निरीक्षक (PI)
आमचे मित्र
मा.श्री. धनंजय देवडीकर (साहेब)
यांची पोलीस निरीक्षक (PI) पदी निवड झाल्याबद्दल...
हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक
अमोल बागडे
सचिन चव्हाण
तेजस मल्होत्रा
नासीर खान
कैलास लोंढे
दुर्गेश राठोड
राहुल बागल
गणेश केंडे
सतीश बाबर
सौदागर सरडे
पितांबर कुकडे
राजेश पाटील
अजित देवकर
अजित कांबळे
ॲड.जगदीश फलके
श्रीनिवास पुराणिक
सागर गांधी
आशिष मेहता
अखिल भाटे
करण शेगर
संदीप पवार
सागर पुराणिक
अभय पुराणिक


## संघर्षयोध्दा मनोज जरांगे-पाटील यांच्या
# मराठा आरक्षण आंदोलनास पाठींबा : शंभुराजे जगताप



करमाळा (सं.प्र.) : संघर्ष योध्दा मनोज जरांगे-पाटील यांनी आंतरवली सराटी (जि.जालना) येथे सुरु केलेल्या मराठा आरक्षण आंदोलनास करमाळा शहरासह तालुक्यातील जनतेचा उस्फुर्त जाहीर पाठींबा असून मराठा समाजासाठी निस्वार्थपणे मनोज जरांगे-पाटील यांनी जनआंदोलन करून जो लढा उभारलेला आहे त्यास फक्त मराठा समाजच नव्हेतर संपूर्ण अठरापगड जातीच्या बांधवांचा सुध्दा पाठींबा आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून करमाळा तालुक्यासह सोलापूर जिल्ह्याच्या राजकारण व समाजकारणात मराठा बांधवासह सर्व जाती धर्मासोबत जगताप गट नेहमीच राहिला आहे.

याचाच एक भाग म्हणून जगताप गटाचे युवा नेते शंभुराजे जगताप हे बाजार समितीचे संचालक दादासाहेब लबडे आणि सागर दोंड यांनी मराठा आंदोलनास पाठींबा देण्यासाठी १२ जून रोजी करमाळा तालुक्यातील सकल मराठा समाजातील युवक व बुजूर्ग नागरीकांना करमाळा येथून आंतरवली सराटी येथे जावून आरक्षण आंदोलनास पाठींबा द्यायला जाण्यासाठी आवाहन केले होते. यामध्ये जगताप गटाचे युवा नेते शंभुराजे जगताप हे गट-तट- पक्ष बाजुला ठेवून सहभागी झाले होते. यावेळी करमाळा तालुक्यातील ६० वाहनांमधून शेकडो युवक व बुजूर्ग सहभागी झाले होते.




डोळ्यांचा दवाखाना
डॉ.नायकुडे यांचे
श्रीजय नेत्र रुग्णालय
डॉ.सौ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे.
M.S.(Ayu.) Gold Medalist
नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर करमाळा.मो.9834071218 / 9921013493
दवाखान्याची वेळ-सोमवार ते शनिवार सकाळी १०.३० ते रात्री ९.०० पर्यंत
रविवार- सकाळी १० ते दु.२ वाजेपर्यंत
इमर्जन्सी सेवा उपलब्ध
उपलब्ध सुविधा
मोतीबिंदू (Catract) आधुनिक मशिनव्दारे शस्त्रक्रिया
डोळ्यांवरील पडदा, तिरळेपणा, लासूर शस्त्रक्रिया उपलब्ध
Nd YAG लेसर सुविधा उपलब्ध
श्रीजय ऑप्टिकल
सर्व प्रकारचे चष्मे तयार करुन मिळतील.

## लेकीचे झाड संकल्पनेच्या पूर्ततेसाठी
# आकाश चिवटे यांचेकडून वाढदिवसानिमित्त धायखिंडीत झाडांचे वाटप



करमाळा(सं.प्र.) : वाढती जागतिक तामपान वाढ पाहता ती रोखण्यासाठी वृक्ष लागवड आणि संगोपन ही महत्वाची गरज आहे. आजच्या तरूण पिढीला यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून करमाळा शहरातील प्रसिध्द शुध्द शाकाहारी चिवटे फॅमिली रेस्टॉरंटचे मालक आकाश चिवटे हे वाढदिवसानिमित्त होणारा वायफळ खर्च टाळून गेल्या तीन वर्षापासून धायखिंडी येथे देशी झाडांच्या रोपांचे वाटप करतात.

तीन वर्षापूर्वी धायखिंडी गावच्या सरपंच अनिता बाळासाहेब मोटे यांच्या संकल्पनेतून धायखिंडी गावात लेकीचे झाड या संकल्पनेची सुरूवात करण्यात आली आहे. यानुसार या गावात मुलींच्या नावाने वृक्षारोपण करून त्याचे संवर्धन करण्यात येते. धायखिंडी गावच्या या विधायक उपक्रमाला करमाळा शहरातील राशीनपेठ तरूण सेवा मंडळाचे कार्यकर्ते व चिवटे फॅमिली रेस्टॉरंटचे आकाश चिवटे हे आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून कुठलाही वायफळ खर्च न करता देशी वाणाचे कडुलिंब, जांभुळ, वड, पिंपळ अशा निसर्गपयोगी झाडांची मोठी रोपे स्वखर्चाने पुरवतात. यावर्षीही १२ जून रोजी असणाऱ्या वाढदिवसानिमित्त चिवटे यांनी धायखिंडी येथे ५० झाडे देऊन ग्रामस्थांच्या सहकार्याने वृक्षारोपण केले. यावेळी ग्रामस्थांनी चिवटे यांचा सत्कार केला. याप्रसंगी करंजे ग्रामस्थांनीही करंजे गावात वृक्षारोपण करण्याचा मानस बोलून दाखवला त्यानंतर दुसऱ्या दिवशी करंजे येथेही शंभर झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी धायखिंडीचे भिवा वाघमारे, बाळासाहेब मोटे, बाबर सर, भरत मोटे, बापुराव महानवर, संतोष महानवर, सुजित वाघमोडे, हर्षल शिंगाडे, रंजित वायकुळे, नाना वायकुळे, शरीफ मुलाणी, विजु सलगर, तात्या मोटे, दिग्विजय चिवटे, ऋतुराज शिलवंत, ओम चिवटे, गार्गी चिवटे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

श्री गजानन अगरबत्ती
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !


पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

**कष्टाला फळ**

# प्रदीप पाडुळे यांची छोट्या ट्रॅक्टरवर घोडदौड

जीवनामध्ये प्रगतीसाठी पैसा, भांडवल, शिक्षण, आधार अशा गोष्टी असाव्यात लागतात असे नेहमी म्हटले जाते. परंतु कष्ट करणारा माणूस असेलतर त्याला कोणत्याही व्यवसायातून प्रगती करता येते; हे पोथरे येथील प्रदीप परमेश्वर पाडुळे या युवकाने दाखवून दिले आहे. पाडुळे यांनी छोट्या ट्रॅक्टरच्या माध्यमातून अनेक व्यवसाय करत दुसऱ्याची शेती वाट्याने करत उत्तम प्रगती केली आहे.

प्रदीप पाडुळे (वय-२९) यांचे शिक्षण अवघे बारावी पर्यंत झाले आहे. वाडवडिलार्जित शेती फक्त दोन एकर. अशा स्थितीत प्रगती होणे अवघड होते. शिक्षण नाही, भांडवल नाही पण कल्पकता असेलतर यशस्वी घोडदौड करता येते. अगदी तसंच पाडुळे यांनी छोटा ट्रॅक्टर नातेवाईकांकडून उसणे पैसे घेऊन व बँकेच्या कर्जावर घेतला. ट्रॅक्टर घेतल्यानंतर त्यांनी वेगवेगळी कामे सुरू केली. पेरणी, मोगडा-पाळी, सरी पाडणे, बाग बांधणी करणे, पिकावर फवारणी एवढेच नाहीतर याच ट्रॅक्टरवर मळणी यंत्र बसवून सुगीच्या कालावधीत ज्वारी, गहू, उडीद अशा पिकांची मळणी करून देतात. काम चांगले आणि बोलताना गोडवा यामुळे एकदा काम केले की, शेतकरी पाडुळे यांची पुन्हा वाट पाहतात. त्यामुळे त्यांच्या ट्रॅक्टरला सतत काम असते. थोडासा वेळ मिळाला की त्यातून ते वाट्याच्या शेतीत काम करतात. घरची दोन एकर आणि वाट्याची ११ एकर अशी १३ एकर शेती करून ट्रॅक्टरचे काम ते करतात. शेती आणि ट्रॅक्टरच्या माध्यमातून वर्षाकाठी १२ ते १५ लाखाचे उत्पन्न मिळवतात. धोरण आणि काम करण्याची तयारी असेलतर कोणत्याही क्षेत्रात यश मिळते हेच प्रदीप पाडुळे यांनी दाखवून दिले आहे.



वडील परमेश्वर पाडुळे व आई सुरेखा पाडुळे हे सुरूवातीला दुसऱ्याच्या शेतात कामाला जात होते. ही बाब मला खटकत होती. त्यामुळे जादा शिक्षण व नोकरी यावर लक्ष न देता व्यवसायावर लक्ष दिले. कमलाई कारखान्यावर काही दिवस काम केले. पण त्यात समाधान नव्हते. म्हणूनच ट्रॅक्टर घेतला. पत्नी सौ.सुप्रिया हिचे पाठबळ आहे. मला श्रेयांश हा छोटा मुलगा आहे. मी व माझा सर्व परिवार वाट्याच्या शेतीत नियोजनपूर्वक काम करतो व त्यातूनच उत्पन्नही मिळवतो. भविष्यामध्ये मोठा ट्रॅक्टर तसेच जेसीबी, पोकलॅन सारखे यंत्र घेऊन प्रगती करण्याचे धोरण आहे.

**...प्रदीप परमेश्वर पाडुळे पोथरे (७०२०८४२७१४)**







खुशखबर..! खुशखबर..!!
शेतकरी बंधुंनो..,
RASI
परिवार
आपल्यासाठी घेऊन
आला आहे उत्कृष्ट
आणि दर्जेदार हायब्रीड
मका
RMH 3499
व R 3414
R 3414
RMH 3499
प्रतिक्षा करू नका..,
आजच जवळच्या
विक्रेत्यांकडून "रासी कंपनी"
चे RMH 3499 किंवा
R 3414 मका खरेदी करा !
RMH 3499
किंवा R 3414 च्या
तीन पॅकेटच्या खरेदीवर
मिळवा एक आकर्षक
किसान बॅग मोफत
संपर्क
रासी सीडस्, 8007655596 / 9309703938


आरोग्यदुत
मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता निधी कक्षप्रमुख
मुख्यमंत्र्याचे विशेष कार्यअधिकारी
मा.श्री.मंगेश नरसिंह चिवटे
यांना वाढदिवसाच्या...
15 JUNE
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
• दिपक रामलिंग पाटणे
(शिवसेना वैद्यकिय मदत कक्षप्रमुख - करमाळा तालुका)


We create Topers !
अखेर इंग्रजीला करमाळ्यात पर्याय मिळाला !
गायकवाड क्लासेस
महेंद्रनगर, करमाळा., जि.सोलापूर
इ.१० वी मधील 'इंग्रजी' विषयातील यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !
100% यशाची परंपरा
भगवती इंगळे (इंग्रजी-९५)
प्रतिभा चुंबळकर (इंग्रजी-९५)
श्रेया कुलकर्णी (इंग्रजी-९४)
राज काटुळे (इंग्रजी-९४)
सार्थक यादव (इंग्रजी-९२)
समीक्षा कटारिया (इंग्रजी-९१)
ऋतुजा चौधरी (इंग्रजी-९१)
ओंकार जाधव (इंग्रजी-९१)
निधी देवी (इंग्रजी-९१)
पायल राऊत (इंग्रजी-९०)
ऋत्विज नलवडे (इंग्रजी-९०)
आदित्य शिंदे (इंग्रजी-८९)
गोविंदराव पवार (इंग्रजी-८७)
ऋषीकेश चौधरी (इंग्रजी-८६)
प्राची कदम (इंग्रजी-८६)
हिंदवी पवार (इंग्रजी-८६)
समृध्दी शेंडगे (इंग्रजी-८५)
रितेश थोरात (इंग्रजी-८५)
सुप्रिया ढेरे (इंग्रजी-८५)
प्रथमेश तळपडे (इंग्रजी-८४)
विश्वजित तोरमल (इंग्रजी-८४)
मोहित कांबळे (इंग्रजी-८४)
प्रेम दुर्गुळे (इंग्रजी-८४)
तनया आमृळे (इंग्रजी-८१)
प्रतिक्षा आमृळे (इंग्रजी-८१)
प्रिया आवटे (इंग्रजी-८०)
श्रृती क्षीरसागर (इंग्रजी-८०)
दि.१७ जून पासून इ.५ वी ते १२ वी सेमी तसेच मराठी माध्यम रेग्युलर बॅचेस सुरू !
मार्गदर्शक
एम.ए.गायकवाड (सर)
मो.9922255475, 9511921175

हार्दिक अभिनंदन ! हार्दिक अभिनंदन !



करमाळा नगरपरिषदेचे **श्री.विनोद राखुंडे** यांची महाराष्ट्र नगरपरिषद लेखापाल पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन !

शुभेच्छुक

**श्री.दत्तात्रय भिकू घोलप** (ग्रंथपाल)

**श्री.प्रदीप बाबुशा चौकटे** (ग्रंथालय सेवक)

**श्री.अमोगसिध्द सिध्दाराम परशेट्टी** (ग्रंथालय मदतनीस)

**श्री ज्ञानेश्वर वाचन मंदिर मुक्तद्वार वाचनालय**

करमाळा नगरपरिषद, करमाळा.

करमाळा शहरात प्रथम सुरू..!

**पाटील** स्किन, हेअर अ‍ॅन्ड जनरल क्लिनिक

Reg no.42433

**डॉ.सौ.अर्चना दिनेश पाटील**
( Clinical Cosmetologist & Trichologist )

उपलब्ध सुविधा

- **त्वचा :** P.R.P. चिकित्सा, I.P.R.F. चिकित्सा, P.R.P. मायक्रोक्नीडलिंग, अँटी येजिंग थेरपी, मुरूम व मुरूमाचे डाग घालवणे, बांग व व्रण घालवणे, चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवणे, ब्रायडल फेशियल, मेडी फेशियल, हायड्राफेशियल, स्किन पोलिशिंग, चामखीळ काढणे, मस काढणे, पर्मनंट आयब्रो, पर्मनंट लिप कलर
- **केस :** P.R.P.चिकित्सा, I.P.R.F.चिकित्सा, I.J.F.C.थेरपी, टक्कल पडणे, केस गळणे, केसातील कोंडा घालवणे, केसांची वाढ खुंटणे, केस पांढरे होणे, चाई पडणे





● सर्व आजारांवर उपचार ● रक्त लघवी तपासणी ● लहान मुलांना वाफ देणे ● सांधेदुखी, कंबरदुखी ● होमिओपॅथिक उपचार

पत्ता : संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.9604801573

## सोलापूर जिल्ह्यातील पाच विधानसभा शिवसेना लढवणार : महेश चिवटे



करमाळा(सं.प्र.) : सोलापूर जिल्ह्यात शिवसेना शिंदे गटाची मोठी ताकद असून पारंपारिक पध्दतीने वर्षानुवर्षे शिवसेनेकडे असलेल्या पाच मतदार संघ शिवसेना लढवणार असल्याचा दावा जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी केला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे या संदर्भातील लेखी अहवाल पाठवला असून धनुष्यबाणावरच या जागा लवढणार असल्याचा दावा पाचही जिल्हाप्रमुखांनी केला आहे. शहर मध्य, करमाळा, माढा, सांगोला, मोहोळ या पाच विधानसभा लढवण्याची तयारी शिवसेना तर्फे सुरू झाली आहे. याबाबत जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांसह तालुका प्रमुखांनी सविस्तर निवेदन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे.

याबाबत बोलताना संपर्कप्रमुख महेश साठे म्हणाले, की जिल्ह्यातील दोन्ही लोकसभा मतदार संघ भाजपाच्या वाट्याला गेल्यामुळे शिवसेना जिल्ह्याला न्याय मिळाला नाही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत या पाच मतदारसंघात शिवसेना पूर्ण ताकदीने उतरणार आहे. संपर्कनेते संजय मशेलकर यांनी या मतदारसंघाचा आढावा घेतला असून जवळपास पाच बैठका या मतदारसंघात शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या झाल्या आहेत. या पाचही मतदारसंघात शिवसेनेकडे तगडे उमेदवार असून आम्हाला कोणताही उमेदवार आयात करण्याची गरज नाही.

या निवडणुकीच्या माध्यमातून शिवसेनेचे धनुष्यबाण चिन्ह व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे जनतेच्या हितासाठी केलेले काम जनतेपर्यंत पोहोचवण्याचं काम केले जाणार आहे. २१ जुन पासून सोलापूर जिल्ह्यात शिवसंपर्क मोहिम राबविण्यात येणार असून प्रत्येक खेड्यात शिवसेनेचे पदाधिकारी बैठका घेऊन मुख्यमंत्री यांनी केलेली जनतेची कामे लोकांपुढे मांडणार आहेत; असेही महेश साठे यांनी सांगितले.

## पपणबाई नामदेव जाधव यांचे अल्पशा आजाराने निधन




करमाळा (सं.प्र.) : येथील निवासी नायब तहसीलदार विजय जाधव यांच्या मातोश्री पपणबाई नामदेव जाधव (रा.शेलगाव क, वय-७०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांचे मागे तीन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. नायब तहसीलदार विजयकुमार जाधव, सार्वजनिक बांधकाम खात्याचे शाखा अभियंता जयकुमार जाधव व शिक्षक प्रमोद जाधव यांच्या त्या आई होत.




करमाळा शहरातील रहिवाशी
व आमचे मित्र
मा.श्री.
धनंजय देवडीकर (साहेब)
यांची
पोलीस निरीक्षक (PI) पदी
मुंबई येथे निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक
संदीप पोपटराव पवार
बालाजी पोपटराव पवार
पवार परिवार, करमाळा.



माजी आमदार
माजी नगराध्यक्ष
युवा नेते
ॲड.कमलाकर वीर
(मा.उपनगराध्यक्ष, करमाळा नगरपरिषद)
श्री.दादासाहेब पुजारी
करमाळा येथील महात्मा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या पर्यवेक्षक पदी
श्री.रमेश मुरलीधर भोसले (सर)
यांची नियुक्ती झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
श्री.रमेश भोसले (सर)
(पर्यवेक्षक, म.गांधी विद्यालय)
शुभेच्छुक
श्री.महादेव विष्णुपंत भोसले, श्रीदेवीचामाळ
कमलाई गारमेंटस्, करमाळा.
कै.सुभाष पाटील ग्रा.बि.सह. पतसंस्था, साडे (सर्व संचालक व कर्मचारी स्टाफ)
साडे विविध कार्यकारी सेवा सोसायटी (चेअरमन व संचालक मंडळ)


15 JUNE
मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता निधी कक्षप्रमुख व मुख्यमंत्र्याचे विशेष कार्यअधिकारी
श्री.मंगेश चिवटे
यांना वाढदिवसानिमित्त लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा
शिवसेना शाखाप्रमुख, हिवरवाडी
श्री.आजिनाथ महादेव इरकर
शुभेच्छुक
पाटील मोबाईल शॉपी
भाजी मंडई जवळ, करमाळा.
प्रोप्रा : महेश आजिनाथ इरकर
मो.७०२०३७६१५१


करमाळा शहरातील
रहिवाशी व आमचे मित्र
श्री.धनंजय
देवडीकर साहेब
यांची पोलीस निरीक्षक
पदी मुंबई येथे
निवड झाल्याबद्दल
हार्दिक
अभिनंदन
शुभेच्छुक
न्यु हॉटेल संगम
पंजाब वस्ताद चौक, करमाळा.
प्रोप्रा : संदीप चुंग
कमलाई लॅब, करमाळा.
महेश गवळी
हॉटेल प्रेमाचा चहा
जयसिंग सातपुते, करमाळा.


आशिर्वाद
मुख्यमंत्री वैद्यकिय मदत
कक्षाचे प्रमुख व मुख्यमंत्री
मा.एकनाथ शिंदे यांचे
ओ.एस.डी.
श्री.मंगेश(दादा)
नरसिंह चिवटे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
15 JUNE
शुभेच्छुक
विटूकडे बंधू व परिवार
करमाळा, जि.सोलापूर
श्री.गणेश विटुकडे


15 JUNE
मुख्यमंत्री वैद्यकिय मदत कक्षाचे
कक्षप्रमुख व मुख्यमंत्री मा.एकनाथ
शिंदे यांचे ओ.एस.डी.
खासदार श्रीकांत शिंदे
श्री.मंगेश(दादा) चिवटे
श्री.महेश चिवटे (जि.प्रमुख)
यांना वाढदिवसाच्या..
उपजिल्हाप्रमुख, शिवसेना
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्रीकृष्णा कन्स्ट्रक्शन, करमाळा
(इंजि.अनिल पाटील, मो.७३८७६५७८५८)
इंजि.अनिल पाटील


One step towards sucess & only one way is.. 2024
दर्जेदार शिक्षणाचा उत्तम पर्याय..!
MOHITE CLASSES
of Science & Technology
Quality for Education
Science विषयात 90 व त्यापेक्षा अधिक गुण मिळवणारे 21 विद्यार्थी 80 च्या पुढे २३ विद्यार्थी
मोहिते क्लासेस मधील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !
आयुष मोटे (गुण-९८)
ऋत्विज नलवडे (गुण-९७)
वेदिका मारकड (गुण-९७)
देशना संचेती (गुण-९६)
सिध्दी जगताप (गुण-९५)
आर्या खोड (गुण-९५)
अजिंक्य शिंदे (गुण-९५)
सृष्टी वारे (गुण-९४)
आलिया शेख (गुण-९३)
महेक मलिक (गुण-९३)
शिवानी गोफणे (गुण-९३)
यशवी वासानी (गुण-९२)
तेजस्वीनी कौले (गुण-९२)
प्रणिती गाडे (गुण -९२)
इबाद बागवान (गुण-९२)
वैष्णवी खराडे (गुण -९१)
रितेश खडसरे (गुण -९१)
सार्थक यादव (गुण -९०)
धनराज कारटकर (गुण -९०)
अनुजा मारकड (गुण -९०)
गौतमी क्षीरसागर (गुण -९०)
अपुर्वा थोरबोले (गुण-८८)
प्रथमेश सितापुरे (गुण-८८)
विश्वजीत जाधव (गुण-८८)
विश्वजीत तोरमल (गुण-८७)
कुणाल कांबळे (गुण-८६)
पृथ्वीराज जगताप (गुण-८६)
असिया घोडके (गुण-८५)
अजित तळेकर (गुण-८५)
आर्यन गायकवाड (गुण-८५)
पार्थ घोगरे (गुण-८५)
गौरी चव्हाण (गुण-८४)
संध्या खताळ (गुण-८४)
श्रेयश खराडे (गुण-८४)
हर्षल मल्हारे (गुण-८४)
श्रध्दा चिंचकर (गुण-८३)
जय थोरात (गुण-८३)
आदित्य नलवडे (गुण-८३)
प्रियंका हांडे (गुण-८१)
कोयल परदेशी (गुण-८०)
प्रथमेश वाघमोडे (गुण-८०)
ओम जाधव (गुण-८०)
हिंदवी पवार (गुण-८०)
वैशिष्टे
● बदलत्या पॅटर्नप्रमाणे तंत्रज्ञानाच्या आधुनिक दर्जेदार पध्दतीनूसार शिक्षण. ● प्रशस्त हॉल ● वरील सर्व परिसर सीसीटीव्हीच्या कक्षेत ● पार्कींगची सोय ● एसी क्लासरूम ● सर्व चाप्टर प्रोजेक्टर-व्दारा ई-क्लास वर सरळसोप्या भाषेत समजावून सांगणार. त्यावर पुन्हा रिव्हीजन घेऊन Daily DPT Test घेतल्या जातील.● सोप्या भाषेत शंका निरसन केले जाईल. ● Extra Study साठी नाईट क्लासची सोय ● वैयक्तीक लक्ष, घोकमपट्टीपेक्षा Topic understanding वर जास्त भर.
● पत्ता ●
मोहिते क्लासेस
स्वामी विवेकानंद चौक, सावंतगल्ली करमाळा., जि.सोलापूर
Contact
Mo - 9763161023
Mo - 7620244276
Mo - 9421030181


रामवाडी ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच
विविध कार्यकारी सोसायटीचे माजी चेअरमन व आमचे मित्र
श्री.अजित(अण्णा) रणदिवे यांचे
६१ व्या (एकसष्टी) वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा...
एकसष्टीनिमित्त
श्री.अजित(अण्णा) रणदिवे यांचा
मंगळवार, दि.१८/६/२०२४ रोजी सायं.६ वाजता
अभिष्टचिंतन सत्कार सोहळा
मा.श्री.विलासरावजी घुमरे (सर)
(सचिव, विद्या विकास मंडळ करमाळा)
यांचे शुभहस्ते संपन्न होणार आहे !
आपले विनीत : समस्त रणदिवे परिवार, रामवाडी
स्थळ : विठ्ठल व्हेज हॉटेल, खडकी, ता.दौंड
(पुणे-सोलापूर हायवे)
शुभेच्छुक
श्री.सुहास गलांडे
श्री.नंदकुमार भोसले
श्री.राजेंद्र धांडे
डॉ.गोरख गुळवे
श्री.आजिनाथ लाळगे
श्री.विजयकुमार गायकवाड
श्री.नागनाथ लकडे
श्री.लक्ष्मण(तात्या) रांधवण
श्री.लतीश लकडे
श्री.शंकर माने
व समस्त मित्र परिवार


आमचे जावई
मा.श्री.
धनंजय देवडीकर साहेब
यांची पोलीस निरीक्षक (PI) पदी
निवड झाल्याबद्दल...
हार्दिक अभिनंदन
श्री.सुनील पुराणिक
श्री.अजय पुराणिक
श्री.किरण देशपांडे
कु.जिजा
कु.कायरा
शुभेच्छुक
• श्री.सुनील पुराणिक • सौ.अलका सुनील पुराणिक
• सौ.सोनल धनंजय देवडीकर • सौ.सुजाता अजय पुराणिक
• सौ.प्रज्ञा किरण देशपांडे • समस्त पुराणिक परिवार, श्रीदेवीचामाळ

उधळीन जीव तुझ्या पायी रऽऽऽ

# मंगेश चिवटे यांचा झंझावत



आजवरच्या महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वसामान्य जनतेला सहजपणे भेट देणाऱ्या मुख्यमंत्र्यांमध्ये एकनाथ शिंदे यांचे नाव अग्रक्रमाने क्रमांक एक वर असेल याबाबत कोणाच्याही मनात शंका नसावी. सत्ता हे लोककल्याणाचे प्रभावी साधन आणि माध्यम असते, या न्यायाने मुख्यमंत्र्यांनी या सत्तेचा थेट लाभ समाजातील शेवटच्या घटकाला करवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केल्याचे वारंवार अनेक प्रसंगातून स्पष्ट होत आहे. सीएम म्हणजे चिफ मिनीस्टर नसून कॉमन मॅन आहे, हे मोठ्या मनाने सांगत आपल्या सहकाऱ्यांच्या मनात मी तुमच्यातीलच एक आहे, ही भावना निर्माण करणारे मुख्यमंत्री म्हणून संपूर्ण देश आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाहतो आहे. अशी प्रचंड कार्यक्षमता अंगी बाळगून असलेल्या मुख्यमंत्र्यांचा एवढा मोठा व्याप सांभाळायला माणसंही तेवढीच कार्यकुशल, बुध्दीमान, हजरजबाबी अन् विनयशील असणं अत्यंत आवश्यक होतं. यामुळेच सत्ता परिवर्तनानंतर पहिल्यांदाच जी निवडक सात शिलेदार नेमल्या गेली त्यापैकी एक म्हणजे करमाळा भुमीपूत्र मंगेश चिवटे!

हाडाचे अन् वंशाने पत्रकार असणाऱ्या चिवटे यांना मुंबई, पुणे, नागपूर ही शहरं नवीन नव्हती. अगदी दिल्लीसुध्दा! त्यांच्या आतील पत्रकारामुळे अन् स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांमुळे चिकीत्सक वृत्ती हा चिवटे यांचा स्थायी भाव. भारताच्या कानाकोपऱ्यातील भौगोलिक स्थानांपासून ते खाद्य संस्कृती पर्यंत आणि त्या त्या भागातील राजकीय इतिहासापासून ते सामाजिक स्वास्थ्यापर्यंत इत्यंभूत माहिती संकलनाचा नामी छंद असणारे चिवटे आज सर्वच क्षेत्रातील मान्यवरांना आपलेसे वाटतात, ही त्यांच्या स्वभावातील वैशिष्ट्यपूर्ण खास बाब!

मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता निधीचा कार्यभार समर्थपणे सांभाळणारे मंगेश चिवटे शिवसेना वैद्यकिय मदत कक्षाचे संस्थापक आहेत. वैद्यकिय क्षेत्रातील मागील जवळजवळ आठ वर्षापासूनच्या पूर्णवेळ अनुभवामुळे चिवटेंना अनेक आजाराविषयी, त्यावरील उपचार पध्दती, त्यासाठी लागणारी वेगवेगळी उपकरणे, अनेक चाचण्या याचे सखोल ज्ञान आत्मसात झाले आहे. स्वत:च्या आतील विद्यार्थी कायम जागृत ठेवा; असा संदेशच जणू ते आपल्या कृतीतून आम्हा सर्वांना देत आहेत.

साहित्याची आवड असणाऱ्या मंगेश चिवटे मधील वाचक आणि श्रोता खुप दर्दी आहे. त्यांच्यातील कवी, एक मित्र म्हणून मला जवळून अनुभवता देखील आला. यामुळेच की काय, चिवटे यांच्या चेहऱ्यावरील प्रसन्नता, सकारात्मकता आणि स्वभावातील स्थितप्रज्ञता, संयमीपणा तसूभरही ढळताना कधी जाणवत नाही.

श्रीश्री रविशंकर महाराजांचे शिष्यत्व स्विकारलेले चिवटे आपल्या सहकाऱ्यांना काम सांगताना सुध्दा विनंतीवजा बोलतात. हा त्यांच्यातील महत्वपूर्ण गुण सर्वांनीच अंगी बाळगण्या-सारखा आहे. एखाद्यावेळी एखाद्याचे काही चुकलेच तर प्रेमाने रागवणे, हा प्रकार नेमका काय असतो हे सुध्दा त्यांच्या सानिध्यात राहिल्यावर लक्षात येते. गोरगरीब, निराधार, दु:खी व्यक्तींच्या चेहऱ्यावरील हास्य हेच माझ्या कार्यक्षमतेचे टॉनिक आहे हे सांगणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शिष्य असल्यामुळे त्यांचीच प्रेरणा मला या सामाजिक कार्यात कायम अशिर्वादरूपी प्रोत्साहन देते असे मंगेश चिवटे नेहमीच कृतज्ञतापूर्वक सांगतात. सत्ताधाऱ्यांसोबत विरोधकांशीही सौहार्दपूर्ण स्नेह ठेवण्याच्या चिवटे यांच्या स्वभावाचा सत्तापरिवर्तनात देखील मोठा फायदा झाला असणार यात तीळमात्र शंकान ाही. त्यांच्या याच स्वभावामुळे सरकारवर देखील अनेकदा प्रहार होता होता राहिले आहेत, हेही तितकेचं खरे! त्यामुळेच विद्यमान शासन, प्रशासन आणि मतदार यांच्यातील महत्वपूर्ण दुवा म्हणून चिवटे यांचेकडे पाहिले जाते. मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता निधीचा तळागाळापर्यंत झालेला लाभ सरकारची जनमाणसातील प्रतिमा उंचावण्यासाठी मोलाची भुमिका निभावत आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत देखील शिवसेनेचा स्ट्राईक रेट इतरांपेक्षा अधिक असण्याच्या काही कारणांमध्ये हे एक कारण निश्चितच विचार करण्याजोगे आहे.

मंगेश चिवटे या बहुआयमी व्यक्तीमत्वाबद्दल बोलणे, लिहिण्यासारखे खूप काही आहे. रूग्णसेवेतून प्रचंड पुण्य कमावणाऱ्या माझ्या मंगेश चिवटे सरांना दीर्घायुष्याच्या शुभेच्छा!

...डॉ.शार्दुल संतोषराव भणगे (रूग्णसेवक, धामणगावकर)

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
आता आपल्या करमाळ्यात !
उपलब्ध सुविधा...
- मुळव्याधवर इंजेक्शन
- डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे
- संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे
- संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे
- भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई

विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

नाव नोंदणीसाठी संपर्क
मो.9763035862

बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

## पोलीस निरीक्षक पदी धनंजय देवडीकर यांची निवड



करमाळा(सं.प्र.): तेली गल्लीतील रहिवाशी धनंजय मुकुंद देवडीकर यांची पदोन्नतीने मुंबई येथे पोलीस निरीक्षक म्हणून निवड झाली आहे.

देवडीकर यांचे प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण करमाळा येथे झाले आहे. त्यानंतर त्यांनी पुणे येथे दोन वर्षे लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी केली. त्यातून वित्त लेखाधिकारी म्हणून त्यांची निवड झाली होती. सहा महिन्यांनंतर त्यांची राज्य लोकसेवा आयोग मार्फत पोलीस उपनिरीक्षक पदी २०१० साली मुंबई येथे निवड झाली. पोलीस खात्यांतर्गत त्यांना पदोन्नतीने बढती मिळाली असून पोलीस निरीक्षक म्हणून त्यांची मुंबई येथेच निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल मित्रपरिवार तसेच करमाळा तालुक्यातून त्यांचे विशेष अभिनंदन होत आहे.

## रेवती उमेश जाधव हिचे नीट परीक्षेत यश



करमाळा(सं.प्र.) : करमाळा येथील रहिवाशी रेवती उमेश जाधव हिने वैद्यकिय राष्ट्रीय प्रवेश पात्रता (नीट) परीक्षेत ७२० पैकी ६९० गुण मिळवून दैदिप्यमान यश संपादन केले आहे. शैक्षणिक आयुष्यात महत्वाचा टप्पा असणारी व एमबीबीएस प्रवेश प्रक्रियेसाठी राबवली जाणारी ही परीक्षा आहे. कु.रेवती जाधव हिने इंजिनिअरींगसाठी जेईई मेन्स मध्ये ९९.८० टक्के गुण मिळवले आहेत. इ.१० वी सीबीएसईमध्ये ९९.६० टक्के गुण मिळवले आहेत. तिचे दहावी पर्यंतचे शिक्षण जवाहर नवोदय विद्यालय पोखरापूर येथे झाले आहे. तिचे ११ वी व १२ वी चे शिक्षण कोटा, राजस्थान इथे झाले. तिला १२ वी ला ९६.०७ गुण मिळाले आहेत. कु.रेवती ही करमाळा येथील डॉ.उमेश जाधव व डॉ.सौ.उर्मिला उमेश जाधव यांची कन्या आहे. तिने मिळवलेल्या यशाबद्दल तिचे करमाळा शहर व तालुक्यातून कौतूक होत आहे.

नेरले येथे जलजीवन विहिरीचे कामात अपहार

## औदुंबरराजे भोसले यांचा आमरण उपोषणाचा इशारा

करमाळा(सं.प्र.) : नेरले येथील जलजीवन विहिरीचे काम न करता अपहार केलेल्या निधीची कागदपत्रे न दिल्यामुळे माजी सरपंच औदुंबरराजे भोसले यांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. याबाबत भोसले यांनी प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की नेरले येथे जलजीवन अंतर्गत ९५ लाख रूपये निधी मंजूर आहे. त्या निधीमधून विहिरीचे काम न करताच जुनीच पाणीपुरवठ्याची विहिर दाखवून सुमारे सात लाख रूपये निधी अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार यांनी संगणमताने उचलून अपहार केला आहे. याविषयीची मागणी केलेली कागदपत्रे दोन महिन्यापासून देत नसल्यामुळे नेरले ग्रामस्थांसह ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालय करमाळा येथे कागदपत्रे मिळेपर्यंत आमरण उपोषणास बसण्याचा इशारा औदुंबरराजे भोसले यांनी दिला आहे. या निवेदनावर अजित जयहरी सावंत, दादासाहेब दौंड, अभिमान जगताप, सरपंच रावसाहेब गलांडे, युवराज महाडिक आदींच्या सह्या आहेत.

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
Ambuja Cement
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

### विविध सामाजिक उपक्रम राबवून
# महाराणा प्रतापसिंह जयंती उत्साहात साजरी




करमाळा(सं.प्र.) : शहरातील सकल राजपुत समाज तथा महाराणा प्रतापसिंह जयंती उत्सव समिती च्या वतीने महाराणा प्रतापसिंह जयंती विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त मंगळवारपेठ येथील महाराणा प्रतापसिंह पुतळा परिसरात सजावट करण्यात आली. तसेच नवजवान सुतार तालीम तरूण मंडळाकडून मंगळवार पेठ येथील महाराणा प्रतापसिंह पुतळा परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. ८ जूनला सकाळी दहा वाजता पत्रकार व मान्यवर डॉक्टरांच्या उपस्थितीत रक्तदान शिबीराचे उद्घाटन झाले. या शिबीरात १०९ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले. यात महिलांचाही प्रतिसाद होता. रक्तदात्यांना उत्सव समितीच्या वतीने आकर्षक भेटवस्तू देण्यात आली.


९ जुनला सकाळी साडेआठ वाजता महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्यास अभिषेक करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते श्रेणिकशेठ खाटेर यांनी आपल्या मनोगतात महाराणा प्रतापसिंह यांच्या त्याग आणि शौर्याची महती विषद केली. विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष मिलींद फंड यांनी उत्सव समितीने राबविलेल्या सामाजिक उपक्रमाचे कौतूक करत समितीच्या प्रत्येक उपक्रमास सदैव सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. दुपारी १२ ते ३ या दरम्यान नागरीकांना महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. तसेच श्रीराम प्रतिष्ठान संचलित अन्नपूर्णा योजनेच्या लाभार्थ्यांनाही अन्नदान करण्यात आले. सायंकाळी निघालेल्या मिरवणुकीचे उद्घाटन भाजपाचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शंभुराजे जगताप, टायगर ग्रुपचे तानाजी जाधव, उद्योजक भरत आवताडे यांचे हस्ते करण्यात आले. या मिरवणुकीत राजपुत समाजातील रणरागिणी तलवारबाजी, दांडपट्टा अशा विविध मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिके सादर केली. राजपुतान्यातील पराक्रमी स्त्रीयांच्या वेशातील घोड्यावर स्वार युवती हे या मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण होते. याशिवाय नामवंत बॅन्ड पथकांनीही आपली कला सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

# पर्यावरण दिनानिमित्त करमाळा न्यायालय परिसरात वृक्षारोपण



करमाळा(सं.प्र.) : पर्यावरण दिनाचे औचित्य साधून करमाळा न्यायालय परिसरात विविध जातीच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी दिवाणी न्यायाधीश एखे मॅडम, कुलकर्णी मॅडम, सहाय्यक न्यायाधीश भोसले मॅडम, करमाळा बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड.दत्तात्रय सोनवणे, अॅड.जाधव, अॅड.कमलाकर वीर, अॅड.पवार, अॅड.देवकर, अॅड.बाबूराव हिरडे, अॅड.प्रियल आगरवाल व न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.

श्री यशवंत प्रसाद शिक्षण प्रसारक मंडळ, साडे संचलित
**विद्यार्थी वसतिगृह साडे, ता.करमाळा**
(बी.सी.मुलांसाठी)
**• विद्यार्थी वसतिगृह प्रवेश •**
खालील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देणे चालू आहे. वसतिगृहात अनुसूचित जाती(एस.सी) व अनुसूचित जमाती(एस.टी.) मुलांना प्राधान्य आहे. गरजू विद्यार्थ्यांनी दि.३० जुन २०२४ पर्यंत प्रवेश घेण्याविषयी अवाहन करण्यात येत आहे.
**अधिक्षक**
विद्यार्थी वसतिगृह, साडे ता.करमाळा.
**संपर्कासाठी मो.नं.8888049602 (अधिक्षक)**
**सचिव**
श्री यशवंत प्रसाद शि.प्र.मंडळ
साडे, ता.करमाळा., जि.सोलापूर








वैद्यकिय राष्ट्रीय पात्रता प्रवेश (NEET) परीक्षेत करमाळा येथील डॉ.उमेश जाधव व डॉ.सौ.उर्मिला जाधव यांची कन्या

## कु.रेवती उमेश जाधव

हिने ७२० पैकी ६९० गुण मिळवून यश संपादन केल्याबद्दल..

हार्दिक अभिनंदन !

शुभेच्छुक

**श्री गणेश क्लिनिक लॅब** मेनरोड, करमाळा., जि.सोलापूर

**रेवती हॉस्पिटल** सुतारगल्ली, करमाळा., जि.सोलापूर

---



मुख्यमंत्री वैद्यकिय मदत कक्षाचे कक्षप्रमुख व मुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे यांचे ओ.एस.डी.

## श्री.मंगेश चिवटे

यांना वाढदिवसाच्या..

हार्दिक शुभेच्छा

15 JUNE



श्री.राजेंद्र मेरगळ (माजी सरपंच)

शुभेच्छुक

**मेरगळ परिवार, हिवरवाडी**

---

# ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



कै.पपनबाई नामदेव जाधव (मृत्यू दि.७/६/२०२४)

मायेची गेली सावली, करूणेचा सागर हरपला ।
उरली नाही साथ आम्हाला, आठवण येते क्षणाक्षणाला ।।

## कै.पपनबाई नामदेव जाधव

यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो, हीच आमची भावपूर्ण श्रध्दांजली !

**दशक्रिया विधी :** रविवार दि.१६/६/२०२४ रोजी सकाळी नरसिंहपूर(संगम) येथे होणार आहे.

शोकाकुल **जाधव व शिंदे परिवार** शेलगाव(क), ता.करमाळा


---

**सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू. भरून वर्षेभर घरपोच अंक मिळवा..!**

---











मुख्यमंत्री वैद्यकिय मदत कक्षाची संकल्पना मांडून ती यशस्वीपणे महाराष्ट्रात राबविणारे तथा मुख्यमंत्री मा.एकनाथजी शिंदे यांचे ओ.एस.डी. व करमाळ्याचे सुपुत्र

## श्री.मंगेश नरसिंह चिवटे

15 JUNE

यांना वाढदिवसाच्या लाख.. लाख..

हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

**श्री कमलादेवी औद्योगिक सह.वसाहत मर्या; करमाळा.**

चेअरमन, व्हा.चेअरमन, सचिव, संचालक, सभासद व कर्मचारी वृंद

**मेहेर नेत्र अ‍ॅन्ड डेंटल हॉस्पिटल**
बायपास रोड, शाहुनगर, शिंदे हॉस्पिटल शेजारी, करमाळा.
**पाहिजेत**
• फर्मासिस्ट (जागा-१) • सफाई कामगार
• हॉस्पीटल कामासाठी मुलगा/मुलगी
पाहिजेत. तरी इच्छुकांनी तात्काळ संपर्क साधावा !
• संपर्क : डॉ.हितेश बाळासाहेब मेहेर
(मो.7875619696 / 9766579696)

**प्रियंका आय केअर हॉस्पीटल**
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
• लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
• एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

## अविनाश सरडे यांना केळीरत्न कार्यगौरव पुरस्कार प्रदान



करमाळा(सं.प्र.) : चिखलठाण नं.२ येथील प्रगतशील शेतकरी अविनाश मारूती सरडे यांना महाराष्ट्र केळी उत्पादक शेतकरी संघाच्या वतीने महाराष्ट्र केळीरत्न कार्यगौरव पुरस्कार आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांचे हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. अविनाश सरडे यांनी नोकरीच्या मागे न लागता शेती व्यवसायाकडे लक्ष केंद्रीत केले. पारंपारिक शेती न करता आधुनिक पध्दतीने शेती करून युवकांपुढे आदर्श निर्माण केला होता. तसेच केळी क्षेत्रात त्यांनी मोठ्या कष्टाने वाटचाल केली. केळी क्षेत्रातील त्यांचे कार्य प्रेरणादायी ठरल्याने केळी उत्पादक संघाच्या वतीने त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी केळी उत्पादक संघाचे सदस्य तसेच केळी उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'मिशन ग्रीन केडगाव' उपक्रमासाठी तरूणांनी कसली कंबर
# वाढदिवसाचा खर्च टाळून आठवडाभरात १६६ रोपांची वृक्षलागवड

करमाळा(सं.प्र.) : मिशन ग्रीन केडगाव साठी केडगाव येथील तरूणांनी कंबर कसली असून, वाढदिवसाचा खर्च टाळून वृक्ष लागवडीसाठी खर्च करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्याला प्रतिसाद मिळत असून एका आठवडाभरात केडगावात १६६ रोपांची लागवड करण्यात आली आहे. आणखी लागवड करण्यासाठी रोपे उपलब्ध झाली आहेत. तर यावर्षी गाव परिसरात जास्तीत जास्त वृक्ष लागवड करण्याचा संकल्प करण्यात आला असून, गावातील तरूणांकडून त्याला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

केडगाव येथील पर्यावरण स्नेही मित्रांकडून मिशन ग्रीन केडगाव हा उपक्रम राबविण्यात येत असून यावर्षी गावात किमान गावच्या लोकसंख्येएवढी तरी झाडे लावण्याचा संकल्प या मंडळींकडून करण्यात आला आहे. त्याची सुरूवात येथील वैभव बोराडे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त केली होती. त्यांनी आपल्या वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून वाढदिवस साजरा करण्यासाठी आलेल्या मित्रमंडळींना ५१ आंब्याची रोपे भेट दिली व हा उपक्रम पुढे सुरू केला. आठवडाभरात सुर्यकांत केदार, सूरज घनवट, राजेंद्र राऊत, प्रविण शिनगारे यांनी त्यांच्या वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून ११६ रोपांची लागवड केली आहे.



### वृक्षलागवड करणाऱ्यांना रोपे भेट

केडगाव येथील डॉ.शहाजी कानगुडे यांनी त्यांचे वडील कै.परशुराम कानगुडे यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त रोपांसाठी आर्थिक मदत केली असून यामधून आणखी आंब्याची व चिकूची रोपे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. वृक्षलागवड करण्याची इच्छा असणाऱ्या मंडळींना ही रोपे भेट देण्यात येणार असून, इच्छुकांनी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


आमचे मित्र
**श्री.धनंजय देवडीकर(साहेब)**
यांची पोलीस निरीक्षक(PI) पदी निवड झाल्याबद्दल...
**हार्दिक अभिनंदन**
शुभेच्छुक
सुंदरजिवन कॅटल फिडस् (गुळसडीकर)
मंगळवारपेठ, करमाळा.
मे.तिरूपती अ‍ॅन्ड कंपनी
प्रोप्रा : राजुशेठ शियाळ
कमलादेवी रोड, भवानीनाका, करमाळा.

**साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्**
सर्व प्रकारचे स्टील रेलींग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.
प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

**आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर**
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२


करमाळा शहरातील रहिवाशी
व आमचे मित्र
मा.श्री.
धनंजय
देवडीकर (साहेब)
यांची
पोलीस निरीक्षक (PI) पदी
मुंबई येथे निवड झाल्याबद्दल
हार्दिक
अभिनंदन
शुभेच्छुक
व्यंकटेश कन्सलटन्सी
दत्तपेठ, करमाळा., जि.सोलापूर
उदय सुरवसे, अमोल बागडे, संजय टेंगडे, संतोष कुलकर्णी,
वैभव शिंदे, सचिन चव्हाण व मित्र परिवार


आशिर्वाद
आमचे मित्र
श्री.धनंजय देवडीकर साहेब
यांची पोलीस निरीक्षक (PI) पदी
निवड झाल्याबद्दल...
हार्दिक
अभिनंदन
शुभेच्छुक
श्री छत्रपती शिवाजी
तरूण मंडळ
सावंतगल्ली, करमाळा., जि.सोलापूर.

लक्ष्मीकांत देवी (9421063525, 8805633525)

**श्रीजी इस्टेट एजन्सी**

- घरजागा, दुकान जागा
- प्लॉट व बंगले
- जमीन बिनशेती करणे
- व्यवहार करून दिले जातील
- सरकारी दस्तऐवजची कागदपत्र घरपोहोच केली जातील.

पत्ता : मेनरोड, करमाळा.

# खरीप पेरणीसाठी सवलतीच्या दरात बियाणे द्यावेत : शंभुराजे जगताप

करमाळा(सं.प्र.) : शेतकऱ्यांना खरीप पिकांच्या पेरणीसाठी शासनाकडून सरसकट सवलतीच्या दरात बियाणे देण्यात यावे. अशी मागणी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शंभुराजे जगताप यांनी तहसीलदार शिल्पा ठोकडे यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात म्हटले आहे, की सध्या तालुक्यात सर्वदूर समाधानकारक पाऊस झाला आहे. सर्व शेतकरी सध्या खरीप पिकांच्या पेरणीसाठी वापसाच्या प्रतिक्षेत आहेत. दोन–




चार दिवसात पेरणीसाठी वापसा होईल तोपर्यंत पेरणीसाठी बियाणे मिळणे आवश्यक आहे. सध्या शाळा सुरू होत असून चालू शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया चालू आहे. मागील वर्षी भीषण दुष्काळी परिस्थिती होती. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. मुला–मुलींच्या प्रवेशासाठी, त्यांचे दप्तर, शालेय साहित्य खरेदीसाठी चार पैसे शेतकऱ्यांना लागणार आहेत. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांना खरीप हंगामातील उडीद, तूर, मुग, मका, सुर्यफुल, कांदा, सोयाबीन इ. पिकांचे बियाणे सवलतीमध्ये देणे गरजेचे आहे; असेही श्री.जगताप यांनी निवेदनात म्हटले आहे.

**ॲड.बी.के.पिंपरे**
दिवाणी व फौजदारी न्यायालय समोर,
विद्यानगर, करमाळा. ता.करमाळा


## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते, की खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत ही सचिन सुभाष परदेशी रा.जवळा, ता.जामखेड, जि.अ.नगर यांचे मालकीची असून त्यांनी सदर मिळकत आमचे अशिल योगेश सुरेश राखुंडे रा.करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर व गुलाम महंमद शरीफ सौदागर रा.मारवाड गल्ली, उस्मानाबाद, ता व जि.उस्मानाबाद यांना कायमस्वरूपी विक्री करणेचे ठरवून, भाग मोबदला स्विकारून, सदर मिळकतीचा करारनामा दि.१०/५/२०२४ रोजी आमचे अशिलाचे लाभात लिहून व नोंदवून दिलेला आहे. सदर कराराप्रमाणे प्रस्तुत मिळकत खरेदी करणेचा कायदेशीर हक्क व अधिकार आमचे अशिलास प्राप्त झालेला आहे. असे असताना सदर सचिन सुभाष परदेशी हे जाणीवपूर्वक गैरहेतूने आमचे अशिलाचे आर्थिक नुकसान करण्याच्या व स्वत:चा आर्थिक फायदा करण्याच्या उद्देशाने सदर मिळकतीचे बेकायदेशीर हस्तांतरण करून त्रयस्थांचे हक्क, संबंध निर्माण करण्याच्या प्रयत्नात असल्याची खात्रीलायक माहिती आमचे अशिलांना समजलेली आहे. त्यामुळे आमचे अशिल सचिन सुभाष परदेशी यांचेविरूध्द करमाळा येथील दिवाणी न्यायालय व. स्तर यांच्या न्यायालयात दावा दाखल करणार आहेत. सदर मिळकत ही विवादीत असल्याने सदर मिळकतीचे खरेदीखत, साठेखत, करार, गहाण, दान, लिज, कुळ, वहिवाट, विसारपावती तसेच सदर मिळकतीचे मालकी व कब्जा हस्तांतरणासंबंधी कोणतेही व्यवहार/दस्त सचिन सुभाष परदेशी यांचेबरोबर कोणीही करू नयेत. अशाप्रकारची स्पष्ट सूचना देवूनही कोणीही बेकायदेशीरपणे व्यवहार/ दस्त केल्यास सदर व्यवहार/दस्त आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवणूक होवू नये याकरीता सदरची नोटीस देणेत आलेली आहे.

**परिशिष्ट :** मिळकतीचे वर्णन – तुकडी व जिल्हा सोलापूर, पोट तुकडी व तालुका करमाळा मे.दुय्यम निबंधक करमाळा यांचे कार्यकक्षेतील करमाळा ग्रामीण येथील जमीन गट नं.२१९/३/१ यासी एकूण क्षेत्र – ०१.२६ आर (०० हे. ०१ आर पोटखराब्यासहीत) यासी आकारणी रू.०२.३० पैसे पैकी ०० हे. ६२ आर (०० हे. ०१ आर पोटखराब्यासहीत) यासी चतु:सीमा पुढीलप्रमाणे.. पुर्वेस – राम, लक्ष्मण व छाया परदेशी, पश्चिमेस–काझी सर यांची मिळकत, दक्षिणेस – पांडे शिव रस्ता, उत्तरेस – साडेकर यांची जमीन

येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक जमीन, तिचेशी जोडलेल्या सर्व हक्क, अधिकार व हितसंबंधसहीत,
करमाळा. ता.११/६/२०२४

**अशिला तर्फे ॲडव्होकेट**







**ॲड.प्रशांत विश्वास बागल**
एम.ए.एलएल.बी.
रजि नं.एमएएच/१२३५५/२०२१
मु.पो.मांगी, ता.करमाळा.

## खरेदीपूर्वी जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषत: शहर करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर येथील व परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि.सोलापूर सब. डि. व ता.करमाळा पैकी शहर करमाळा येथील व करमाळा नगरपरिषद हद्दीतील विभाग क्र.७ व ८ मधील पुढील खुल्या जागा. (१) म्यु.घर.नं.३२९६ पैकी त्यास सि.स.नं.३८२७/२ पैकी समाईकातील क्षेत्रफळ – १२०.१६ चौ.मी. (२) म्यु.घर नं.३२९५ पैकी सि.स.नं.३८०७ पैकी समाईकातील क्षेत्रफळ सि.स.नं.३८०८ पैकी समाईकातील क्षेत्रफळ– ३१.७६ पैकी चौ.मी. आणि (४) म्यु.घर नं.३२९५ पैकी सि.स.नं.३८१६/१ पैकी समाईकातील क्षेत्रफळ – २५.६० चौ.मी. येणेप्रमाणे वर्णनाच्या मिळकती आतील सर्व तदंगभूत वस्तुसह.. वरील नमूद मिळकती श्री.नितीन पोपटलाल कटारिया यांचे खरेदी मालकीच्या व प्रत्यक्ष ताबे वहिवाटीच्या आहेत. आमचे अशिल श्री.राजेंद्र लक्ष्मणराव पवार /सौ.अनुजा राजेंद्र पवार रा.करमाळा यांनी उपरोक्त नमूद सर्व मिळकती श्री.नितीन पोपटलाल कटारिया यांचेकडून कायम व खुष खरेदी घेणेचे निश्चित केले असून उभयतांचे दरम्यान तसा खरेदी–विक्री करार झालेला आहे. तरी वरील नमूद मिळकतींमध्ये कोणाचे काही एक हक्क–हितसंबंध गुंतलेले असल्यास संबंधिताने ही नोटीस प्रसिध्द झालेपासून २१ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष येऊन पुराव्यानिशी खुलासा करावा. सदर मुदतीअंती आमचे अशिल वरील मिळकतींचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणत्याही व्यक्तीची/संस्थेची काही एक तक्रार/हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवणूक होऊ नये या प्रामाणिक हेतूने ही नोटीस दिली असे. ता.१४/६/२०२४

**अशिला तर्फे ॲडव्होकेट**


शहरात प्रथम (९७.२०%)
भगवती इंगळे (गणित-९३)
गुणवत्तेत सातत्य राखणारा करमाळ्यातील एकमेव क्लास..!
पानसांडे क्लासेस (गणित)
सलग १४ वर्षे पानसांडे क्लासचा विद्यार्थी गणित विषयात करमाळ्यात प्रथम
मार्च २०२४ मध्ये झालेल्या इ.१० वीच्या परीक्षेतील पानसांडे क्लासचे गुणवंत विद्यार्थी
गणितात प्रथम
तेजस्विनी कौले (गणित-९४)
ओंकार जाधव (गणित-९२)
आदित्य शिंदे (गणित-९०)
उत्कर्ष इवरे (गणित-८९)
निलेश शिंदे (गणित-८९)
श्रेया कुलकर्णी (गणित-८८)
चेतना पवार (गणित-८८)
रितेश खरसडे (गणित-८८)
ओम बरडे (गणित-८८)
सार्थक यादव (गणित-८७)
प्रेम टेकाळे (गणित-८७)
विकी पाटील (गणित-८७)
शिवम पिसे (गणित-८७)
शिफा शेख (गणित-८६)
अजित तळेकर (गणित-८४)
संकेत शिंदे (गणित-८४)
रितेश थोरात (गणित-८४)
प्रणव वीर (गणित-८३)
जय थोरात (गणित-८३)
दिशा गायकवाड (गणित-८०)
नंदन नलवडे (गणित-७९)
वर्षा बिनवडे (गणित-७८)
सई फंड (गणित-७७)
आनंदी होनप (गणित-७७)
आयान शेख (गणित-७६)
हर्षल मल्हारे (गणित-७६)
शिवानी गोफणे (गणित-७५)
तेजश्री गवळी (गणित-७५)
टीप : इ.५ वी ते १० वी सेमी इंग्रजी माध्यम आणि इ.९ वी, १० वी मराठी माध्यम गणित विषयाच्या बॅचेस दि.१६ जून पासून सुरू !
मार्गदर्शक : ए.आर.पानसांडे (B.Sc,B.Ed)
पत्ता किल्ला विभाग, करमाळा (९८९०८००७९६)
Miss you कृष्णा (गणित-७९)


आमचे मार्गदर्शक व मित्र
मा.श्री.
धनंजय देवडीकर साहेब
यांची पोलीस निरीक्षक (PI) पदी निवड झाल्याबद्दल...
हार्दिक अभिनंदन !
लेखाधिकारी
श्री.श्रीकांत देवडीकर (कृषी विभाग, अ.नगर)
श्री.बबन क्षीरसागर
श्री.रहिमान मुलाणी
श्री.दिपक मुसळे
शुभेच्छुक
तेली गल्ली, करमाळा.
गंगाराम तालीम मित्र मंडळ, मंगळवारपेठ, करमाळा.
श्री छत्रपती शिवाजी तरुण मंडळ, सावंतगल्ली, करमाळा.